# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी अवलंबित विश्वस्त संस्था

४ था मजला, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

जा.क्र.: का.औ.सं.वि./मानिभ/ 3370 दिनांक : 31/01/2009

## परिपत्रक

विषय : मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या मासिक निर्वाह भत्त्याचे धनादेश व मासिक निर्वाह भत्ता मंजूर झालेल्या वारसांची नावे महावितरणच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत.

****************

तत्कालीन मंडळाच्या वारस कंपन्यांमधील मृत कर्मचाऱ्यांच्या अथवा ज्या कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेतली आहे अशा वारसांची माहिती वेबसाईटद्वारा उपलब्ध व्हावी या हेतूने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी अवलंबित विश्वस्त संस्था यांनी माहे जानेवारी - २००९ मध्ये खाली नमूद केलेल्या विषयासंबंधीची संपूर्ण माहिती महावितरण कंपनीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

१) माहे डिसेंबर - २००८ मध्ये तिन्हीं कंपन्यांतील वारसांना देण्यात आलेल्या मासिक निर्वाह भत्त्याच्या धनादेशासंबंधीची माहिती, इत्यादी सदरची माहिती तीन महिन्यांनी म्हणजे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी मध्ये अद्यावयत करण्यात येईल.

२) माहे नोव्हेंबर -२००८ मध्ये झालेल्या विश्वस्त संस्थेच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये मासिक निर्वाह भत्ता रु. २०००/- मंजूर केलेल्या वारसांची यादी. (मंजूर झालेल्या यादीमध्ये विश्वस्त संस्थेच्या कार्यालयामध्ये दि. ३१/०३/२००८ अथवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात आला आहे.) सदरची माहिती ज्या-ज्यावेळी विश्वस्त संस्थेची बैठक होऊन प्रकरणे मंजूर होतील त्याप्रमाणे ती माहिती अद्यायवत (up date) करण्यात येईल.

**टीप :** वेबसाईटवर माहिती www.mahadiscom.in (EMPLOYEE PORTAL) मध्ये उपलब्ध असेल.

सर्व कंपन्यांमधील संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना व सांघिक कार्यालयामध्ये असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना अशी विनंती करण्यात येते की, परिपत्रकातील तरतुदीबाबत व वेबसाईटची माहिती सर्व वारसदारांना देण्यात यावी की, जेणे करुन प्रत्येक वारसदारांना त्यांना हवी असलेली माहिती संगणकाद्वारे वरील वेबसाईटवर पाहाता येईल व केवळ या कारणास्तव वारसांना सांघिक कार्यालय, मुंबई येथील विश्वस्त संस्थेच्या कार्यालयात येण्याची गरज भासणार नाही. सदर परिपत्रक क्षेत्रीय कार्यालयातील सूचना फलकावरही लावण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

विश्वस्त संस्थेच्या कार्यकारी समितीच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार सदरचे परिपत्रक काढण्यात आले आहे.

किशोर पवार

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रेषण यादीप्रमाणे (सर्व कंपन्यामधील) मुख्य अभियंता / मुख्य महाव्यवस्थापक व तत्सम अधिकारी यांना रवाना.

E:\Backup Of Meena\D Drive\SPMane\mmb paripatrak.doc